# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.15/06/2017 रोजी (का.प.क्र.02) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

गुरूवार दिनांक 15/06/2017 रोजी (का.प.क्र.02) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.05 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.रविंद्र निकम (उपआयुक्त (प्र)),नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
11. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
12. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
13. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
14. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.सभापती :सर्व स.सदस्य, मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी आणि पत्रकार यांचे स्वागत करण्यात येते, शहराच्या विकासाचे प्रश्न या ठिकाणी मांडावे, प्रस्ताव मांडल्यानंतर आपल्या प्रस्तावाचा विचार करण्यात येईल, प्रशासनो शहर विकासासंबधी आम्ही मांडलेल्या प्रस्तावावर अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक बैठकीचे मिनीटस् शक्य तितक्या लवकर पुढील सभेमध्ये कन्फरमेशनला येणे गरजेचे आहे. पत्रकार यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सहकार्य करण्यात यावे. आजची बैठक सुरू करण्यात येत आहे. स.सदस्य श्री.राजगौरव वानखेडे यांनी एक पत्र माझ्याकडे सादर केलेले आहे. त्या पत्राची दखल घेण्यात आलेली आहे.

श्री.सिताराम सुरे :सर्व प्रथम मा.सभापती यांचे सभागृहात स्वागत करण्यात येते. वार्ड ब कार्यालयासाठी जेटीग मशीन मिळत नाही. माझ्या वार्डात जवळजवळ चार गल्ल्यांमध्ये ड्रेनेजचे पाणी साचलेले आहे. गेल्या सहा महिण्यांपासून दूरूस्ती संबधी पाठपुरावा करीत आहे. कार्यकारी अभियंता, वार्ड अभियंता यांना सूचना करण्यात यावी की, वार्डातील नागरीकांच्या समस्या कशी सुटेल याची दखल घेण्यात यावी. वार्ड अभियंता यांना वारंवार फोन करण्यात येतो, परंतु प्रतिसाद देण्यात येत नाही. त्यांना ताकीद देण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :10 वी 12 वीत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :महानगरपालिकेचा विद्यार्थी श्री. मोरे याने 94% गुण घेवुन महानगरपालिकेच्या शाळेमधुन उत्तीर्ण झालेला आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. त्याचे व इतर गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात यावे. महानगरपालिकेतर्फे लवकरात लवकर त्यांचा सत्कार करण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे :अनुमोदन देण्यात येते.

श्रीमती संगिता वाघुले :उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांनी निकाल उंचावण्यासाठी सहकार्य केलेले आहे त्यामुळे चांगल्या पध्दतीचा निकाल लागलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये उत्कृष्ट निकाल लागलेला आहे.

मा.सभापती : सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. शिक्षण विभागाने महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांचे सभागृहातर्फे सत्काराचा कार्यक्रम लवकरात लवकर आयोजित करण्यात यावा.

श्रीमती किर्ती शिंदे :बैठकीचे इतिवृत्त वेळोवेळी देण्यात यावे.

वार्ड अभियता(श्री.जाधव):जेटींग मशिन उपलब्ध करून दिल्यास स.सदस्य यांच्या वार्डातील प्रश्न मिटेल.

श्री.सिताराम सुरे :वार्डातील नागरीकांच्या रोषास आम्हाला सामोरे जावे लागते.

श्रीमती संगिता वाघुले :एका वर्षापासून माझ्या वार्डातील परिस्थिती श्री.जाधव वार्ड अभियंता यांना माहिती आहे, वार्डातील नागरीक पुन्हा पुन्हा आमच्याकडे येवुन तक्रार करतात त्यावेळेस संबधीतांना संपर्क साधला असता कर्मचारी पाठवुन देतात, परंतु सदरील काम पुर्ण न करता किंवा काम न करता परस्पर कर्मचारी निघुन जातात. संबधीत वार्ड अभियंता किंवा इतर कुठलाही कर्मचारी अधिकारी काम झाले आहे किंवा नाही याची साधी दखलही घेत नाही. त्यामुळे नागरीक पुन्हा आमच्याकडे तक्रारी घेवुन येतात. जेटींग मशीनचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, जेटींग मशीनची मागणी वारंवार केली जाते. परंतु जेटींग मशिन उपलब्ध करून देण्यात येत नाही. रोज या संबधी पाठपुरावा करीत आहे.

वार्ड अभियता(श्री.जाधव):मिसारवाडी भागात पाण्याची लाईन नाही. त्यामुळे नागरीक कमी प्रमाणात पाण्याचा वापर करतात आणि त्यामुळे ड्रेनेज ब्लॉक होण्याचे प्रमाण वाढते. जेटींग मशिन मारल्यानंतर पुन्हा काही दिवसांत ड्रेनेज लाईन तुंबते, जेटींग मशिन मिळाल्यास कामे करून देण्यात येईल.

प्र.उपअभियंता (यांत्रिकी):दोन शिफ्टमध्ये जेटींग मशिन चालु करण्याबाबत विचाराधिन आहे. चेसिस खरेदि करण्याकरीता संचिका लेखा विभागामध्ये प्रलंबित आहे.

मा.सभापती :चेसिसचा पुरवठा अद्यापपर्यंत का करण्यात आला नाही.

प्र.उपअभियंता (यांत्रिकी): गुरूवारी जेटींग मशिन लावण्यात येते, चेसिस खरेदी करण्यासाठी Advance Payment द्यायचे आहे, टेंडरमध्ये तसे नमुद आहे.

श्रीमती संगिता वाघुले :वारंवार सांगुनही अधिकारी हा प्रश्न सोडवत नाही,

श्री.राजगौरव वानखेडे :स्थायी समितीने मंजूरी दिलेली आहे, Advance Payment देण्याबाबत टेंडरमध्ये प्रस्तावित केलेले होते का?

प्र.उपअभियंता (यांत्रिकी):स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे, टेंडरमध्ये तसे नमुद आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : Advance Paymentची पध्दत चुकीची आहे, ही मागणी टेंडरमध्ये कशी टाकली, कंत्राटदाराच्या मनमानीप्रमाणे महानगरपालिकेचा कारभार चालणार आहे का? टेंडरमध्ये नमुद केले आहे का की, टेंडरमध्ये आहे.

प्र.उपअभियंता (यांत्रिकी): संबधीताची तशी मागणी होती, Advance Payment घेतल्याशिवाय काम करत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रत्येक ठेकेदार Advance Payment ची मागणी करेल,

श्री.रेणुकादास वैद्य : Advance Payment ची अट कुणी टाकली, Advance Payment ची अट कशासाठी टाकली.

श्री.राजगौरव वानखेडे :महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नसतांना संबधीताने टेंडर भरायला नको होते. त्याच्यामुळे नागरीकांना वेठीस धरण्यात येत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : अशा पध्दतीने मनमानी करीत असेल तर व पुरवठा करीत नसेल तर अनेक अशा अनेक कंपण्या आहेत की त्या चेसिस देतील. नव्याने टेंडर काढण्यात यावे.

मा.सभापती :सदर प्रकरणाची संचिका माझ्यासमोर सादर करण्यात यावी.

श्रीमती मनिषा मुंडे :माझ्या वार्डातील समस्या मी प्रत्येक बैठकीत मांडत आहे. 150 घरांमध्ये पाणी गेलेले आहे. भरपावसामध्ये मी स्वतः त्या ठिकाणची अवस्था बघीतलेली आहे. माझी कळकळीची मागणी आहे की, ते पाणी बंद करावे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):मा.महापौर यांचेसोबत सदर ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी झालेली आहे, मा.महापौर यांचे समवेत झालेल्या बैठकीत त्या ठिकाणी स्ट्रॉर्म गटर करणे अत्यंत आवश्यक आहे. मार्कींग केलेली आहे. प्रशासकीय विभागाने पुढील कार्यवाही करावी. मा.महापौर, मा.आयुक्त, मा.उपमहापौर यांची पाहणी झालेली आहे.

मा.सभापती :त्वरीत पाहणी करून प्रश्न सोडविण्यात यावा.

श्री.शेख सोहेल :ट्रस्टची गोशाळाची जागा आहे, एनओसीची गरज काय आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी)पावसाळी गटार तयार करावयाची आहे. डिमॉलिश करून नंतर काम करण्यात येईल.

मा.सभापती : घरे काढुन टाकण्याबाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा करण्यात येईल. नैसर्गिक प्रवाहानुसार काम करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):गौशाळेची विष्टा ड्रेनेजलाईनमध्ये सोडण्यात येते, त्यांची खाजगी जागा आहे त्या जागेतुन ड्रेनेजलाईन टाकण्याबाबत मागणी आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्या श्रीमती मनिषा मुंडे गेल्या दोन वर्षापासून त्यांचे वार्डाच्या कामाबाबत वारंवार सांगत आहे. त्या भागातील जनता गरीब आहे. कामगार वस्ती आहे. कष्टाने बांधलेली घरे आहेत आणि भुमिगत गटार योजनेसाठी ती घरे न पाडता ड्रेनेज लाईन का टाकण्यात येत नाही. घरे न पाडता लाईन टाकता येते तर मग घरे पाडण्याचा आग्रह का करण्यात येतो. गरीब जनतेचे घरे पाडण्यासाठी अधिकाऱ्यांना कुणी अधिकार दिला. घरे पाडण्याशिवाय पर्याय नसेल त्यावेळेस ती स्थिती समजु शकतो. त्या ठिकाणी लाईन टाकण्याची व्यवस्था होवु शकते. गरीबांची घरे पाडण्यासाठी का निघाले, घरे पाडण्यासाठी मनपा प्रशासनाने सुपारी घेतलेली आहे का? मा.खासदार आणि आम्ही स्वतः त्या ठिकाणी पाहणी करण्याकरीता आलेलो आहे, पर्यायी व्यवस्था त्या ठिकाणी आहे, नगरसेविकेचे विनाकारण नाव बदनाम करत आहे, त्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था आहे, त्या पध्दतीने भुमिगत गटार योजनेचे काम व्हावे, कुठल्याही घराला हात न लावता काम करण्यात यावे. अशी सूचना देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी): स.सदस्य यांचे मताशी सहमत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :भुमिगत गटार योजनेसंदर्भात या योजनेचे प्रमुख यांनी उत्तर द्यावे. स्थायी समिती सभेने दिनांक 29.04.2014 मध्ये एजन्सी फिक्स केली. 30.68 वर मंजूरी दिली. प्रशासनाने सभेसमोर भुमिगत गटार योजना ची शहराला कशासाठी गरज आहे. (याबाबत प्रस्तावातील परिच्छेद स.सदस्य सभागृहास वाचून दाखवतात.) या 30 जुन रोजी 3 वर्ष पुर्ण होणार आहे, आत्तापर्यंत भुमिगत गटार योजनेचे किती काम झालेले आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीक आत्तापर्यंत 50 टक्के खर्च झालेला आहे. 232 कोटींचे काम झालेले आहे. 70 टक्के काम झालेले आहे. महानगरपालिकेचे 54.35 कोटी रूपये टाकण्याचे राहिलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :या 36 महिण्यांमध्ये भुमिगतचे किती किलोमीटर काम झालेले आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी): नाल्यामध्ये 62.50 किलोमीटर लाईन टाकलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :लाईन टाकल्यावर नाल्यामध्ये थोडाही मल दिसणार नाही. म्हणुन सांगण्यात आले होते. नाल्यातील लाईन किती ॲटॅच केली आणि लाईन बंद झालेली आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी)सध्या मेनसिव्हर लाईनमध्ये लक्ष केंद्रित करीत आहोत. दुसऱ्या टप्प्यामध्ये लाईन ॲटॅचचे काम करण्यात येणार आहे. काही ठिकाणी थोडयाफार तांत्रिक कामांच्या अडचणीमुळे काम थांबलेले आहे हे सर्व कनेक्शन जोडण्यात येणार आहे. पुढील टप्प्याचे हे नियोजन आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रशासनाच्या मते 70 टक्के काम झालेले आहे परंतु कोणत्याही नाल्यामध्ये लाईन जोडलेली नाही.कोणत्या नाल्यांमध्ये ती लाईन जाडलेली आहे.खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :मेन सिव्हरचे काम झाल्यावर दुसऱ्याटप्प्यामध्ये ते काम करण्यात येईल. सर्व लाईन नाल्यातील जोडण्यात येणार आहे. मिसारवाडी भागात काम झालेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :डिपीआरनुसार काम झालेले आहे का? डिपीआरबाबत माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):डिपीआर तयार करण्याबाबत मुंबईच्या एका एजन्सीची नेमणुक केलेली होती.

श्री.राजगौरव वानखेडे :सदरील एजन्सीला 3 कोटी 58 लाख रूपये डिपीआर तयार करण्यासाठी दिलेले आहे. आत्तापर्यंत 02 कोटी 18 लाख रूपये दिलेले आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी)डिपीआरचे दर ठरलेले आहे त्यानुसार काम दिलेले आहे.

री.राजगौरव वानखेडे :डिपीआर तयार केल्यानंतर केंद्रशासनाने दिलेल्या मान्यतेनुसारच काम करण्यात येणार आहे का? खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):नाल्यामध्ये कित्येक ठिकाणी अतिक्रमण असल्यामुळे बदल करावा लागलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :डिपीआर तयार करत असतांना हया गोष्टी निदर्शनास आणुन दिल्या होत्या का?

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):चेंजेस झालेले आहे,

श्री.राजगौरव वानखेडे :आत्तापर्यंत किती चेंजेस झालेले आहे. केंद्र शासनाकडे जो डिपीआर तयार केला त्यात किती टक्के चेजेस झालेला आहे. जे चेंजेस झालेले आहे त्याची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन (केंद्र शासनाची)मान्यता घेतलेली आहे का?

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):याबाबत शासनाकडे रिपोर्ट सादर केलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मान्यता दिलेली आहे का?

कार्यकारी अभियंता (श्री.अफसर सिद्दीकी):नोडल एजन्सी मार्फत रितसर प्रस्ताव सादर केलेला आहे. चेंजेस होत आहे परंतु योजनेची कॉस्ट वाढत नाही,

श्री.रेणुकादास वैद्य :योजनेत खुप मोठया प्रमाणात चेंजेस केलेले आहे जे की, करायला नको होते. सहा एसटीपी तयार करणार होतो त्यापैकी चार एसटीपी करण्यात आले. एनपी 3 च्या ऐवजी एनपी 2 पाईप वापरतो. राईझिंगमेल मध्ये मोठया चेजेस करतोय. या बदलास कुठलीही परवानगी घेतलेली नाही. पाईपच्या बाबतीत जीवन प्राधिकरणाने स्पष्टपणे प्रशासनाला सांगितले होते, परंतु जीवन प्राधिकरणाच्या सूचनेला केराची टोपली दाखवलेली आहे. कंत्राटदाराला मदत होईल अशा प्रकारचे नियोजन प्रशासनाने केलेले आहे. शहर हे पर्यटन केंद्र आहे, शहराच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या दृष्टीने ही योजना मंजूर केली, मा.खासदार यांचे समवेत या योजनेच्या कामाची पाहणी केली आहे. सन 2014 मध्ये निविदा काढत असतांना कुठली टेक्नॉलॉजीचा वापर करावयाचा तसेच नाल्यामध्ये एक थेंबभर पाणी राहणार नाही, शहरातील सर्व भागाच्या अंतर्गत वाहिन्या मिळुन मेन लाईनला जोडुन कव्हर्ड करून नाल्यामधुन जाईल. यावर प्रक्रीया करून ते पाणी उद्योगासाठी, गार्डनसाठी वापरण्याबाबतचे डिपीआरमध्ये नियोजन सांगण्यात आले होते. भूमिगतचे 30 ते 40 टक्के काम शहरात झालेले आहे. 232 कोटी रूपयांचे पेमेंट दिलेले आहे. कामाचे आणि दिलेल्या देयकाचे कुठेही बोध होत नाही, पीएमसीला डिझाईनसाठी, मॉनेटिरिंगसाठी वेगवेगळे पेमेंट दिलेले आहे. योग्य काम होत आहे की, नाही, सूचनांचे पालन होते की, नाही याचे कुठलेही मॉनेटिरींग झालेले नाही, महानगरपालिकेचे कुठलेही यावर नियंत्रण नाही. भूमिगतला साधी नोटीस देवुन प्रशासनाने सोपस्कर पार पाडलेले आहे.300 ते 400 कोटींचा पैसा हा पाण्यात चाललेला आहे. प्रशासनाच्या मते 80 टक्के काम पुर्ण झालेले आहे, परंतु अजुनही काही भागामध्ये लाईनच टाकलेल्या नाही, मिसारवाडी भाग सोडता कुठेली ड्रेनेजलाईन जोडलेली नाही. महानगरपालिकेचे 54 कोटी रूपये देणे बाकी आहे, श्री.अफसर सिद्दीकी यांचा 56 कोटी देण्याचा आग्रह आहे. या योजनेची वाट लावलेली आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. सहा एसटीपी ऐवजी चार एसटीपी करण्यात आलेल्या आहेत. पाईपची गुणवत्ता बदलेली आहे. जीवन प्राधिकरणाच्या सूचनेची दखल घेतलेली नाही. याची सीबीआय चौकशी करण्यात यावी. या योजनेचे टेक्निकल ऑडीट होणे आवश्यक आहे. टेक्निकल ऑडीटशिवाय एक रूपयाही बील अदा करण्यात येऊ नये, Financial Audit शिवाय देयक देण्यात येऊ नये, या संपूर्ण योजनेची सीबीआय चौकशी ची मागणी मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे यांनी केली आहे. स.सदस्य श्री.कैलास गायकवाड यानी सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. या गोष्टींची गंभिर दखल घेवुन मा.सभापती यांनी त्यांच्या लेटरहेडवर सीबीआय चौकशीची मागणी करण्यात यावी. या पुर्ण प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. डिझाईन चुकीची केलेली आहे, रेल्वेच्या परवानगीचे कारण सांगत आहे, डिपीआर तयार करतांना या गोष्टींचा विचार का करण्यात आला नाही. बदलाला मंजूरी दिलेली नसतांना प्रशासनाच्या म्हणण्यानुसार कॉस्टमध्ये चेंज झालेला नाही, या पुर्ण योजनेचा बट्टयाबोळ करण्याचे काम खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर, फोट्रेस आणि श्री.अफसर सिद्दीकी, कार्यकारी अभियंता यांनी केलेले आहे. मागणी आहे आग्रह आहे सीबीआय चौकशी सभापती यांच्या लेटरपॅडवर स्थायी समितीचा ठराव म्हणुन करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :आयआयटी, पवई कडुन काही मार्गदर्शन मागविले होते का? त्यांनी काही सूचना केल्या होत्या ते चेंजेस केलेले आहे का?

कार्यकारी अभियंता : Valocity Maintain करण्याबाबत सूचना केलेली आहे, आयआयटी, पवई यांची व्हिजीटही ठेवण्यात आलेली आहे. तपासणी करण्यासाठी येणार आहे. पाण्याचा प्रवाह असा पाहिजे की, पाईपाचा सिल्टींग होवु नये.

श्री.रेणुकादास वैद्य :साधे लेवल घेण्याचे कष्टसुध्दा घेण्यात आलेले नाही.

| | |
|---|---|
| श्री.राजगौरव वानखेडे | :आयआयटी, पवई यांनी Valocity Maintain करण्याबाबत सूचना केलेली आहे नाही तर System पुर्ण चोकअप होईल म्हणुन सांगीतलेले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रत्यक्ष पाहणीच्यावेळी नविन टाकलेली ड्रेनेजलाईन पुर्णतः चोकअप झालेली आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :माझ्या वार्डातील लाईन पुर्णतःब्लॉक झालेली आहे, नाथ सुपर मार्केट येथे नविन चेंबर बांधलेले आहे, त्या ठिकाणी लाईन कशी टाकणार. 10 फुटावर आहे, |
| कार्यकारी अभियंता | :लाईन टाकलेली आहे, |
| श्री.राजगौरव वानखेडे | :दिशाभुल केलेली आहे. या सर्व योजना पुर्ण कोलॅप्स केलेली आहे. आयआयटी, पवईचा रिपोर्ट आहे, यामध्ये थोडयाफार प्रमाणात बदल केला तरी लाईन कोलॅप्स होईल, चोकअप होईल म्हणुन सांगितलेले आहे. एसटीपी प्लॅन्ट कुठे कुठे आहे माहिती देण्यात यावी. |
| कार्यकारी अभियंता | :कंाचनवाडी, पडेगांव, बनेवाडी आणि झाल्टा असे चार एसटीपी प्लॅन्ट आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :एसटीपीला 101 कोटी सहा एसटीपीवर खर्च करत आहे. |
| कार्यकारी अभियंता | :झाल्टा येथे 20 एमएलडीच्या ऐवजी 35 एमएलडी केलेला आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :एसटीपी बदल बाबत केंद्र शासनाची परवानगी घेतलेली आहे का? |
| कार्यकारी अभियंता | :मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे. शासनाशी प्रत्यक्ष जावुन चर्चा केलेली आहे, मुळ खर्च वाढत नसेल तर करण्यास हरकत नाही म्हणुन सांगण्यात आले आहे. अंतर्गत बदलास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊ शकतात म्हणुन सांगण्यात आले होते. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :तसे शासनाचे पत्र आहे का? |
| कार्यकारी अभियंता | :चर्चा झालेली आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :राज्य शासनाची, केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते. |
| कार्यकारी अभियंता | :प्रस्ताव रितसर सादर केलेला आहे, सन 2015 रोजी कळविलेले आहे, दर तीन महिण्याला रिपोर्ट सादर केलेले आहे. मार्च 2017 पर्यंत रिपोर्ट सादर केलेला आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :एसटीपीवर जास्तीचा किती खर्च झाला, झाल्टा येथे महानगरपालिकेच्या फंडातुन त्या ठिकाणी खर्च केला होता. तो यामध्ये धरण्यात आला होता का? |
| कार्यकारी अभियंता | :जुना एसटीपी झाल्टा येथे आहे परंतु त्या खर्चाचा आणि हा खर्च वेगळा आहे. नविन एसटीपी उभारलेला आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :जुन्या एसटीपीचा खर्च वाया गेलेला आहे. |
| कार्यकारी अभियंता | :जुन्या एसटीपीच्या लेवल वेगळया होत्या, त्याचा उपयोग घेतलेला नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : ज्या मान्यता घेणे आवश्यक होत्या त्या मान्यता घेतलेल्या नाही. जानेवारी 2009 चा शासन निर्णय आहे, तांत्रिक ऑडीट होणे आवश्यक आहे. |
| कार्यकारी अभियंता | :शासकीय अभियांत्रिकी कॉलेजकडून रितसर पाहणी चालू आहे,ऑडीट चालू आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :24 कोटी रूपयांच्या रस्त्याबाबत तत्कालिन आयुक्त यांनी शासकीय अभियांत्रिकी कॉलेजकडून ऑडीट न करता पुणे येथील थर्डपार्टी ऑडीट करून घेतले आहे. संबधीत कंत्राटदार ब्लॅकलिस्ट केले आहे. भूमिगतचे थर्डपार्टी ऑडीट होणे गरजेचे आहे. |
| कार्यकारी अभियंता | :आयआयटी, पवई यांना थर्ड पार्टी ऑडीट संबधी पत्र दिलेले आहे. त्यांचा सकारात्मक रिप्लाय आलेला आहे. |
| मा.सभापती | :चेंजेसचा व इतर बाबतीत मा.सर्वसाधारण सभाची, मा.आयुक्तांची मान्यता घेतलेली आहे का? |
| कार्यकारी अभियंता | :मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवलेले होते, 30.11 च्या मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली आहे. |

श्री.रेणुकादास वैद्य :दिनांक 30.11. च्या मा.सर्वसाधारण सभेपुर्वीच हे सर्व चेजेंस झालेले होते.

श्री.राजगौरव वानखेडे :पाईप हे आयएसआय पाहिजे होते.

श्री.रेणुकादास वैद्य :30.11 रोजी Extra Itam साठी प्रस्ताव आला होता, खिल्लारी कन्स्ट्रक्शनला अतिरिक्त 35 कोटी रूपये देण्याचे ठरले होते, 35.64 च्या खचाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवला होता, त्या प्रस्तावामध्ये मधे चेंजेस बाबतीत टाकण्यात आले होते. 30.11 च्या सभेपुर्वी चेजेंस् झालेले होते त्यामुळे Extra Itam आला होता. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांना पत्रव्यवहार केलेला आहे प्रस्ताव विखंडीत करण्यासंबधी विनंती केलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सभेपुर्वी यांनी सर्व चेजेंस केलेले होते, एसटीपी बदलची मान्यता घेणे आवश्यक होते, 292 कोटी रूपये शहरासाठी आले होते, या सर्व प्रकरणाची तांत्रिक चौकशी होणे आवश्यक आहे, शहरातील असंख्य ठिकाणी भुमिगतमुळे रस्ते खचलेले आहे, तांत्रिक, Financial ऑडिट करण्यात यावे.

श्री.शेख मतीन :नुर कॉलनी येथे भुमिगतचे काम करण्यात आले परंतु माती तशीच ठेवलेली आहे.

कार्यकारी अभियंता :तत्कालिन आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी विशेष केस म्हणुन दिलेल्या आदेशानुसार त्या ठिकाणी काम केलेले आहे. नाल्यातील पाणी लोकांच्या घरात जात होते, 120एम एम ची पाईप टाकुण काम केलेले आहे. तेथील नागरीकांनी त्यावर मातीचे थरच्या थर टाकुण ब्लॉक केलेले आहे. त्यामुळे पाणी जात आहे.

श्री.शेख मतीन :नाला बंद करून पाईप लाईन टाकण्यात आली होती. हे काम करण्याची गरज नव्हती. संबधीत अधिकारी हे मनपाचे आहेत की, खिल्लारी कंपणीचे आहे सुरूवातीपासून कंपणीची बाजू मांडत आहे.

कार्यकारी अभियंता :त्या ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे.

मा.सभापती :नुर कॉलनी येथे प्रत्यक्ष भेट देवुन पाहणी करावी, केलेले अतिक्रमण काढण्यात यावे, मातीची भरती काढण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :भुमिगत गटार योजनेचे काम निष्कृष्ट दर्जाचे आहे. वार्ड अभियंता यांना विश्वासात न घेता काम केलेले आहे. शहर हे स्मार्ट सिटीकडे न जाता वेगळेच काम होत आहे. पाईप लाईनची लेवल बरोबर नाही. पहिल्याच पावसात भूमिगत गटार योजनेचे कामाचा दर्जा दिसलेला आहे. तांत्रिक, Financial ऑडिट करण्यात यावे. तोपर्यंत संबधीत कंत्राटदाराला पेमेंट अदा करण्यात येऊ नये. मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात आलेला प्रस्ताव सर्वसाधारण भाषेत समजेल अशा भाषेत ठेवण्यात यावा. तसेच योजनेचे मेंनटेनन्सचे कामे त्या त्या कंत्राटदाराकडुनच करून घेण्यात यावे.

श्री.शेख मतीन :असेफिया कॉलनी येथील भुमिगत गटार टाकण्यासाठी रस्ते खोदुन ठेवण्यात आले आहे. ते रस्ते तसेच खोदुन ठेवण्यात आले आहे. करारानुसार रस्ते तयार करून देण्यात येईल म्हणुन सांगण्यात आले होते परंतु असे दिसुन येत नाही.

मा.सभापती :स.सदस्य श्री.राजगौरव वानखेडे यांनी जो मुद्दा मांडला व पत्र दिलेले आहे, त्यानुसार या ठिकाणी चर्चा केलेली आहे. स.सदस्यांनी या ठिकाणी आपआपले मत मांडले आहे. घरे न तोडता काम करण्यात यावे या गोष्टीची गंभिर दखल प्रशासनाने या ठिकाणी घ्यावी, प्रशासनाच्या म्हणण्यानुसार काम हे 70 टक्के झालेले आहे, 232 कोटी रूपये दिलेले आहे, वास्तविक काम हे 50 टक्केच झालेले आहे. हे संयुक्तीक वाटत नाही, डिपीआर प्रमाणे काम करण्यात यावे, स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी सांगीतल्यानुसार डिपीआर तयार करतांना योग्य काळजी घेतलेली नाही, ती काळजी प्रशासनाने घेणे आवश्यक होते, ज्या प्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित होते, त्यानुसार

कार्यवाही झालेली नाही, भुमिगत गटार योजनेच्या कामाचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन, financial ऑडिट करण्यात यावे, स.सदस्यांनी कामाची सीबीआय चौकशीची मागणी केलेली आहे, सीबीआय चौकशी न करता आपणच आपल्या मार्फत चौकशी करावी. शहरात भुमिगत गटार योजनेमुळे रस्ते खराब झालेले आहे त्या ठिकाणी रस्ते दुरूस्तीचे काम त्वरीत करण्यात यावे. रस्त्यांचे कॉक्रींटीकरणाचे काम करण्यात यावे, रस्त्यांचे कॉक्रींटीकरणाच्या कामाबाबतची चौकशी करून माहिती सभागृहाला देण्यात यावी. आयआयटी, पवई मार्फत थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करण्यात यावे,

(याच वेळी स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य, श्री.राजगौरव वानखेडे, भुमिगत गटार योजनेचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन होईपर्यंत कोणतेही देयक अदा न करणेबाबतची मागणी सभागृहात करतात)

दहा दिवसांमध्ये टेक्निकल, Financial ऑडिट करण्यात यावे, तो पर्यंत देयक अदा करण्यात येवु नये, तो पर्यंत कोणत्याही प्रकारचे देयक देण्यात येवुन नये.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील रस्त्यांची अवस्था वाईट झालेली आहे.त्यामुळे शासनाने शहरातील रस्त्यांसाठी 150 कोटी रूपये देण्याचे आश्वासन दिलेले आहे त्यामुळे या योजनेच्या डिपीआर तयार करण्यासाठी जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर कंपणीला काम दिलेले आहे परंतु त्यांचे ओनरवर बलात्काराचा गुन्हा दाखल आहे. त्यांचेकडे टेक्निकल स्टाफ आहे का? कर्मचाऱ्यांचे पी.एफ टाकला जातो का? या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :150 कोटींच्या रस्त्यांसाठी डिपीआर तयार करण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. त्यानंतर जगप्रयागला कंत्राट मिळालेले आहे. त्यानंतर तक्रार आलेली आहे की, त्या केससाठी प्रकरण विधी सल्लागार यांचेकडे पाठविलेले आहे. संबधीत हा दोषी आहे का? यासाठी विधी सल्लागार यांचेकडे प्रकरण पाठविलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :एजन्सीकडे टेक्निकल स्टाफ नाही. पीएफ काढण्यात येतो का? जी एजन्सी ब्लॅकलिस्ट केलेली आहे, शासनाने घालुन दिलेल्या नियमांनुसार काम करत नाही, एकदा ब्लॅकलिस्ट केल्यावर पुन्हा काम देता येते का? यासह टेंडर प्रक्रीयेची संपुर्ण माहीती सभागृहासमोर सादर करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :स्थायी समितीने ते टेंडर रद्द केलेले होते, त्यावेळेस चर्चा झाली होती, पुन्हा संबधीतांना काम देण्यात येते, प्रशासन त्यांना पाठीशी घालीत आहे.

शहर अभियंता :टेंडर ओपन कॉल केलेले आहे, स्थायी समितीमध्ये एजन्सी approvel साठी आले होते, स्थायी समितीने मान्यता दिलेली नाही. त्यानंतर ओपन टेंडर केलेले आहे. त्यानंतर स्पर्धात्मकरित्या आलेले टेंडर recommend (शिफारस) केलेले आहे.

मा.सभापती :रद्द केलेले आहे, आता काय समस्या आहे.

शहर अभियंता :त्या वेळेस मान्यता दिलेली नाही, नव्याने टेंडर आलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरील एजन्सीलाच काम देण्याचा हट्टाहस का ? त्यांचेकडे टेक्निकल स्टाफ नाही.

शहर अभियंता :टेक्निकल स्टाफ आहे, पीएफबाबत माहिती नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत एजन्सीला ब्लॅकलिस्ट केलेले आहे, त्यांचेवर गुन्हा दाखल केलेला आहे, स्थायी समितीने एजन्सी रद्द केलेली आहे, नियमानुसार काम करण्यात येत नाही. पाच लाखाचे काम करत असतांना negotiation करण्यात येते, परंतु 150 कोटी रूपयांच्या रस्त्यांसाठी च्या डिपीआरसाठी हया बाबीकडे लक्ष देण्यात येत नाही.

शहर अभियंता :निविदा झाल्यानंतर negotiation ची आवश्यकता वाटत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : Negotiation ला का बोलविण्यात येत नाही, या सर्व गाष्टीं दखल घेण्यासारख्या आहेत.

मा.सभापती :टेक्निकल समस्या असेल तर त्याची दखल घेण्यात येईल. वैयक्तिकरित्या विचार करता येणार नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :वाहनचालकाच्या भरती संदर्भात मा.आयुक्तांची, स्थायी समितीची व सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता 62 वाहन चालक भरती केलेले आहे, चौकशीचे आदेश दिले होते, या संबधी माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :नोव्हेंबर 2016मध्ये यांत्रिकी विभागाने 62 वाहनचालकांची मागणी केली होती. याबाबतचे पत्र कामगार विभागाला मिळालेले होते त्यानुसार विभागाने महाराणा एजन्सी यांना पुरवठा करण्याचे सांगीतले त्यानुसार वाहन चालकांचा पुरवठा केलेला आहे. दोन महिण्यांनंतर माहितीच्या अधिकारात अर्ज आला त्यात 62 कर्मचाऱ्यांना प्रशासकीय मान्यता बाबत विचारणा केली होती. अर्ज माझ्याकडे आल्यानंतर अशी कुठलिही संचिका माझ्याकडे आलेली नव्हती. त्यानुसार विचारणा केल्यानंतर मागणीनुसार कर्मचारी दिले म्हणुन सांगण्यात आले. संचिका आल्यानंतर त्यात चार मुद्दे नमुद केले होते, मा.आयुक्तांच्या मान्यतेच्या संदर्भात खुलासा करण्याच्या सूचना केल्या होत्या. 7 फेब्रुवारी रोजी माझ्याकडुन कामगार अधिकारी या पदाचा चार्ज गेला. दुसऱ्या पेमेंटच्या संचिकेत 62 कर्मचाऱ्यांच्या पेमेंट संदर्भात मुख्यलेखापरिक्षक यांनी अभिप्रायासाठी संचिका माझ्याकडे पाठविली. त्यातही माझा अभिप्राय नोंदविलेला आहे, संबधीतांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्याचे उत्तर आलेले आहे, मा.आयुक्तांकडे निर्णय घेण्यासाठी संचिका पाठविलेली आहे. प्रशासकीय मान्यता घेतलेली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :42 लाखाचे पेमेंट केलेले आहे, सुरवातीपासून कोणतीही मान्यता न घेता कार्यवाही करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेचे नुकसान आहे. त्यांचेवर कारवाई करणे अपेक्षित होते, कोणतीही तक्रार असेल त्याचेवर कारवाई करणे आवश्यक होते, सहा महिणे झालेले आहे, प्रशासन पाठीशी घालत आहे का?

मा.सभापती :मा.स्थायी समितीमध्ये प्रश्न उपस्थित झाल्यावर कोणती कार्यवाही केली.

उपआयुक्त (म) :कारणे दाखवा नोटीस दिल्यावर उत्तर आलेले आहे, पुढील कार्यवाहीसाठी मा.आयुक्तांकडे प्रकरण सादर केलेले आहे. उत्तर हे एप्रिलमध्ये आलेले आहे.

मा.सभापती :या सर्व प्रकरणाची चौकशी करून त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, पुढील बैठकीत त्यांचेवर कोणती कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे, शहर स्मार्ट सिटी म्हणुन संबोधायचे का? नागरीकांसमोर काय म्हणुन आपण सामोरे जायचे.

मा.सभापती :प्रशासनाला सूचना करण्यात येते की, वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीनुसार माहिती देण्यात यावी, कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती मनिषा मुंडे :माझ्या वार्डातील आठ लाईट बंद आहे, विद्युत विभागाला वारंवार संपर्क साधुनही कुणीही दखल घेत नाही.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डातही हाच प्रश्न आहे. संबधीत अधिकारी, गुत्तेदार यांना फोन लावला असता ते फोन उचलत नाही.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता विद्युत (श्री.देशमुख): विद्युत ठेकेदार यांची मुदत संपलेली आहे. याबाबत वरिष्ठांना माहिती दिलेली आहे,ज्याज्या ठिकाणी लाईट बंद आहे त्या ठिकाणी ताबडतोब कार्यवाही केलेली आहे.

श्री.रेणुकादाव वैद्य :पुर्ण शहर अंधारात बुडालेले आहे, विद्युत विभागाकडुन कुठलीही कार्यवाही होत नाही. टेंडर संपण्यापुर्वीच प्रशासनाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

श्रीमती संगिता वाघुले :संबधीत अधिकारी फोनच उचलत नाही, विद्युतची तक्रार कुणाकडे करायची.

श्री.रेणुकादास वैद्य :दुसऱ्या अधिकाऱ्याकडे चार्ज देण्यात यावा.

(याचवेळी काही स.सदस्य संबधीत अधिकारी यांचा चार्ज काढण्याबाबत मागणी करतात)

मा.सभापती :आठ दिवसांचा अवधी देण्यात येतो, शहरातील लाईट ताबडतोब चालु करण्यात यावे, टेंडरची कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती स्वाती नागरे :स्मशानभुमीमधील सर्व लाईट बंद आहेत.

श्रीमती किर्ती शिंदे :बडीगिरणी येथील शाळेचा स्लॅब पडण्यास आलेला आहे याबाबत वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. दुर्घटना घडल्यावर प्रशासन कार्यवाही करणार का?

मा.सभापती :बडीगिरणी येथील शाळेचा स्लॅब पडण्यास आलेला आहे, प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

शहर अभियंता :पाहणी करून ताबडतोब कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :शहर हे पर्यटनाची राजधानी असल्याने शहरात पर्यटन कक्षाचे उद्‌घाटन श्री.आदित्य ठाकरे यांचे हस्ते झालेले आहे. मा.पालकमंत्री या कार्यक्रमाला हजर होते. रेल्वेस्टेशन येथील पर्यटन कक्षात दुर्देवाने मागील एक वर्षापासून सहा कर्मचारी काम करतात. परंतु अद्यापही त्यांचा पगाराचा प्रश्न प्रलंबित आहे. संबधित कर्मचाऱ्यांच्या पगारासंबधी संचिका ही फक्त एका टेवलवरून दुसऱ्या टेबलवर फिरविण्याचे काम चालू आहे. 20 जुन 2016 रोजी पर्यटन कक्षाचे उद्‌घाटन झाले होते तेव्हापासून ते आत्तापर्यंत ही संचिका फिरते आहे. तत्कालिन अति.आयुक्त, उपआयुक्त, विद्यापीठाचे पर्यटन कक्षाचे श्री.रगडे, मा.आयुक्त यांना या संबधी वारंवार बैठका घेतलेल्या आहेत. परंतु त्यांचा पगाराचा प्रश्न सुटलेला नाही. ज्यावेळेस महानगरपालिकेने पर्यटन कक्षामध्ये त्या मुलांना काम करायला सांगितले काम करून घेतले त्या वेळेस महानगरपालिकेला त्यांचा पगार देणे लागतो. त्यामुळे त्याला मंजूरी घ्यायची त्याचा चेक कुणाच्या नावाने काढायचा, विद्यापीठाच्या नावाने कि, विद्यार्थ्यांच्या नावाने, विद्यार्थ्यांच्या नावांने काढायचा तर विद्यार्थी मनपाच्या पे रोलवर नाही. मागच्या वर्षीपासून त्या मुलांना राबविण्यात येत आहे त्या मुलांनी महानगरपालिकेवर 420 चा गुन्हा दाखल करावा. अशी त्यांची मानसिक स्थिती झालेली आहे. या परिस्थितीमध्ये पर्यटनकक्षही बंद पडेल. या शहरात मागच्या वर्षभरापासून साधारणतः 7000 पर्यटकांनी पर्यटन कक्षाला भेट दिलेली आहे. त्यातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील साधारणत:2500 पर्यटक होते. एवढे चांगले काम पर्यटन कक्षाच्या माध्यमातुन होत असतांना चांगली सोय देत असतांना महानगरपालिका या सेवेचाही बट्ट्याबोळ करण्याचे काम करीत आहे.

मा.सभापती :पर्यटन विभागाने खुलासा करावा. पर्यटन विभागाच्या कर्मचाऱ्यांचे पेमेंट का होत नाही.

मुख्यलेखाधिकारी :सदर प्रकरणाची संचिका मंजूरीसाठी मागील महिण्यात आली होती परंतु सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता दिसुन आली नाही. त्यामुळे परत संचिका संबधित विभागाकडे वर्ग केली होती.

श्री.मधुकर गंगावणे (समन्वयक, पर्यटन कक्ष): दिनांक 20.06.2016 रोजी पर्यटन कक्षाचे उद्‌घाटन केले होते. विद्यापीठाकडुन सहा विद्यार्थी त्या ठिकाणी घेण्यात आले होते. प्रायोगिक

तत्वावर त्यांची नियुक्ती केली होती. नियुक्त करतांना विद्यापीठाचे पर्यटन विभागाशी अतिरिक्त आयुक्त यांचेशी संवाद झालेला होता. बोलणी केली होती त्यानुसार संचिकेचा पुढचा प्रवास चालु होता. याच दरम्यान अतिरिक्त आयुक्त यांची बदली झाली, या दरम्यान विद्यापीठ आणि मनपा यांच्यात करार करण्याचे राहुन गेले होते. त्यानंतर सदरील संचिकेवर विविध विभागाचा अभिप्राय आलेला आहे. करारनामा करण्याची विद्यापीठाची तयारी आहे.

मा.सभापती :विद्यापीठाने जेव्हा कर्मचारी मनपाला दिले त्यावेळी मनपाची जबाबदारी आहे त्या विद्यार्थ्यांना वेतन देण्याची. एका वर्षापासून सदरील विद्यार्थ्यांकडून काम करून घेण्यात येत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दिनांक 20.062016 ते आत्तापर्यंत सदरील संचिकेचा झालेला प्रवासाबाबतची माहिती माझ्याकडे आहे. सदरील संचिका फक्त एका टेबलवरून दुसऱ्या टेवबलवर फिरवली जात आहे. यावर कुठलाही निर्णय घेण्यात येत नाही. प्रामाणिकपणे काम करणा-या या विद्यार्थ्यांचा दोष काय आहे. ते दोषी असल्यासारखी त्यांची चौकशी करायची आहे का? मा.आयुक्त महोदय यांना विनंती करण्यात येते की, आजच्या आज या संचिकेवर निर्णय घेण्यात यावा. या विद्यार्थ्यांची सेवा लागत नसेल तर आजपर्यंतचा त्यांचा पगार देण्यात यावा व त्यांची सेवा रद्द करण्यात यावी तसेच त्यांना कळविण्यात यावे. जो निर्णय घ्यावयाचा आहे तो आजच्या आज घेण्यात यावा. मा.आयुक्त महोदय यांचे म्हणण्यानुसार यास मान्यता घेतलेली नाही. नियुक्ती पत्र सदर विद्यार्थ्यांना मागणी होत आहे. मान्यता घेण्याचे काम विद्यार्थ्यांचे नाही. ते काम प्रशासनाचे आहे. तत्कालिन आयुक्त यांनी दोन दिवसात पेमेंट देण्याबाबत आश्वासन दिले होते. आत्ताचे आयुक्तांच्या म्हणण्यानुसार त्यास मंजूरी/मान्यता घेतलेली नाही. असे सांगतात, यामध्ये विद्यार्थ्यांचा काय दोष आहे ही प्रशासकीय बाब आहे यास प्रशासनाने मंजूरी देणे आवश्यक आहे. आजच्या आज मंजूरी देण्यात यावी. पुढे ही सेवा ठेवायची की नाही, त्याचाही निर्णय आजच करा. परंतु आजच्या आज निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :यांत्रिकी विभागामध्ये 62 कर्मचाऱ्यांची मान्यता नसतांना गेल्या दोन महिण्याचे पगार देण्यात आलेला आहे परंतु पर्यटन विभागात एक वर्ष काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना अद्याप का पेमेंट देण्यात आलेला नाही. गेल्या एका वर्षापासून विषय प्रलंबित आहे. महानगरपालिका ही संबधीतांना पेमेंट देणे लागत आहे, यावर प्रशासनाने त्वरीत आजच्या आज निर्णय घेवुन पर्यटन कक्षाच्या विद्यार्थ्यांचे पेमेंट अदा करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे :मुख्यलेखाधिकारी या पदावर रूजु झाल्यापासून किती कंत्राटदारांना पेमेंट देण्यात आले आहे. याची माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी :1 ते 29 नुसार जेष्ठतेनुसार एक कोटी विस लाख आरटीजीएस दिले होते. नंतर मा.आयुक्तांनी निर्देशित केल्यानुसार आवश्यकतेप्रमाणे पेमेंट दिलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :लेखा विभाग पाच टक्के घेवुन चेक काढले जातात हे खरे आहे की, खोटे आहे हे मला माहिती नाही, वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली. ज्या पध्दतीने जेष्ठता यादी तयार केली त्यानुसार चेक काढले पाहिजे, पारदर्शक पणा लेखा विभागात असणे आवश्यक आहे. प्रामाणिकपणे काम करून वर्षानुवर्ष त्यांचे चेक काढले जात नाही. आज कुठलाही कंत्राटदार काम करण्यास तयार नाही त्यास लेखा विभाग जबाबदार

आहे. यासाठी काही सिस्टीम लावली पाहिजे. जेष्ठतेनुसार चेक काढले पाहिजे. हा विभाग डायरेक्ट आपल्या अखत्यारित येतो, चेक कुणाचे काढले याबाबतची माहिती आपल्याला देणे आवश्यक आहे.

श्रीमती नरगीस बेगम :लेखा विभागात जेष्ठतेनुसार पैसे न देता कामे झाली पाहिजे.

मा.सभापती :वार्डामध्ये विकासाचे काम होत नाही वारंवार निविदा कॉल कराव्या लागत आहे याचे कारण लेखा विभागात व्यवस्थित व्यवस्थापनेनुसार काम होत नाही. त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी, पेमेंट काढल्याबाबत माहिती देण्यात यावी. जेष्ठतेप्रमाणे पेमेंट देण्यात यावे.

श्री.शेख मतीन :श्री.जयंत खरवडकर यांची बदली अतिक्रमण विभागात झालेली आहे, ते अतिक्रमण विभागात का रूजू झाले नाही. नियमाप्रमाणे त्यांचेवर कोणती कार्यवाही करणार ?

श्री.सिताराम सुरे :झोन पाच मध्ये श्री.कादरी नावाचे जे.ई. आहे परंतु आजपर्यंत वार्डामध्ये त्यांना मी पाहिलेले नाही, त्यांचेमुळे सर्व कामे थांबलेले आहे, खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :झोन सात मध्ये सतरा वॉर्ड येतात त्यासाठी एकच जे.ई. कार्यरत आहे, वार्डामध्ये ड्रेनेज चोकअप, इस्टीमेट, विविध विकासाचे कामे करण्यास अनेक अडचणी येत आहेत या ठिकाणी एक जे.ई. देण्यात यावा. यासंदर्भात वारंवार मागणी केलेली आहे, परंतु कार्यवाही झालेली नाही.

उपआयुक्त (म) :प्रशासनातर्फ आदेश मिळाल्यावर रूजू होणे अपेक्षित आहे. सात दिवसात रूजू होणे अपेक्षित आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :कोणती कार्यवाही करणार.

मा.सभापती :बदली होवुनही रूजू होत नसेल तर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.

श्री.शेख मतीन :नगर रचना विभागात अधिकारी आणि कर्मचारी कमी प्रमाणात आहे. नगर रचना विभागात मॅनपॉवर वाढविण्यात यावे.

श्रीमती मनिषा मुंडे :माझ्या वार्डात लहान गल्ल्या असल्याकारणाने एखादी फायर संबधी घटना घडल्यास मोठे वाहन जावु शकणार नाही, तरी प्रशासनाने आग विझविण्याकरीता छोटया वाहनाची व्यवस्था करण्यात यावी.

**विषय क्र. 02 :**

दि.02/06/2016 (का.प.क्र.01), दि.22/06/2016 (का.प.क्र.02), दि.02/07/2016 (का.प.क्र.03), दि.04/08/2016 (का.प.क्र.04), दि.23/08/2016 (का.प.क्र.05), दि.26/08/2016 (का.प.क्र.05 दि.23/08/16 ची तहकूब), दि.27/09/2016 (का.प.क्र.06), दि.26/10/2016 (का.प.क्र.07), दि.11/11/2016 (का.प.क्र.07 दि.26/10/16 ची तहकूब), दि.24/11/2016 (का.प.क्र.08), दि.28/12/2016 (का.प.क्र.09), दि.16/01/2017 (का.प.क्र.10), दि.30/01/2017 (का.प.क्र.11), दि.17/02/2017 (का.प.क्र.12), दि.28/02/2017 (का.प.क्र.13), दि.10/03/2017 (का.प.क्र.13 दि.28/02/17 ची तहकूब), दि.21/03/2017 (का.प.क्र.14), दि.07/04/2017 (का.प.क्र.15) व दि.21/04/2017 (का.प.क्र.14 दि.21/03/17 ची तहकूब) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक 02

श्री.सिताराम सुरे :इतिवृत्त पेंडींग का ठेवले याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.शेख मतीन :22 इतिवृत्त एकाच वेळी दिलेले आहे, इतिवृत्तांचा अभ्यास करण्यासाठी काही दिवसांचा अवधी देण्यात यावा. 22 इतिवृत्त पेंडींग का ठेवले, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कोणत्या कलमान्वये इतिवृत्त तयार झाले पाहिजे.

श्रीमती किर्ती शिंदे :झालेल्या बैठकीचे इतिवृत्त येणाऱ्या बेठकीत व शक्य तितक्या लवकर दिल्यास इतिवृत्तामध्ये काही चुका असल्यास त्या दुरूस्त करता येईल. इतिवृत्त लवकरात लवकर देण्यात यावे, जेणे करून त्याचा अभ्यास करून मुद्दे व दुरूस्त्या सभागृहापुढे मांडता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :22 इतिवृत्त एक वर्षाचे आहे, हा विषय स्थगीत ठेवुन पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.

नगर सचिव :(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील इतिवृत्त सभागृहापुढे सादर करावयाचे नियम सभागृहास वाचून दाखवतात.)

श्री.शेख मतीन :अधिनियानुसार इतिवृत्त लवकरात लवकर तयार झाले पाहिजे. असा नियम आहे या नियमानुसार कार्यवाही झालेली नाही. एक एक वर्ष इतिवृत्त प्रलंबित ठेवलेले आहे.

मा.सभापती :नगर सचिव यांना आदेशित करण्यात येते की, या नंतर असा प्रकार होता कामा नये, शक्य तितक्या लवकर, मागच्या सभेचे इतिवृत्त पुढील सभेसमोर सादर करण्यात यावे. विषय पुढील बैठकीपर्यंत स्थगित ठेवण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 03 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक 46 नवाबपुरा अंतर्गत रमनस्तपुरा,गवळीपुरा व इतर ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करणे बाबत या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसूची DSR नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,89,444/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी शासनाकडून प्राप्त रस्ते बांधणे व दुरूस्ती अनुदान योजने अंतर्गत निधी उपलब्ध आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 49,89,444/- मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 3

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत विषयाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

वार्ड अभियंता :वार्ड क्रमांक 46 येथे विविध ठिकाणी कॉक्रीटीकरण करणे संदर्भातील आहे.

मा.सभापती :विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक 46 नवाबपुरा अंतर्गत रमनस्तपुरा,गवळीपुरा व इतर ठिकाणी कॉंक्रीट रस्ते करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 49,89,444/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 04 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे नागसेन कॉलनी येथील सामाजिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ तळ मजला व पहिला मजला एकुण क्षेत्रफळ 348 चौ.मी. असून सदरील सभागृह भाडेतत्वावर मिळणेसाठी अध्यक्ष संकल्प विकास मंडळ (सेवाभावी संस्था) नागसेन कॉलनी, औरंगाबाद ही संस्था हॉलचा वापर सेवाभावी कार्यासाठी करणार असल्याने यांनी प्रतीमाह रू.10,000/- प्रमाणे भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केलेली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

सदरील संस्थेच्या मागणी नुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.753, दि.20/02/2015 च्या ठरावानुसार संस्थेने सदरील सभागृहाची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक स्वखर्चाने करणेच्या व प्रतीमाह भाडे

रू.10,000/- प्रमाणे व इतर कर वेगळे या अटीस अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 4 बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :नागसेन कॉलनी येथे महानगरपालिकेचे मालकीचे सभागृह आहे, 10,000 रूपये प्रतीमाह भाडे देण्यास संबधीत सामाजिक संस्था तयार आहे. सामाजिक उपक्रमासाठी मागणी केलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील महानगरपालिकेचे सभागृहांसाठी एकत्र पॉलिसी ठरविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेने आदेशित केलेले आहे, नाममात्र शुल्क आकारून संबधीत संस्थेने मेंन्टेनन्स् करावे अशा पध्दतीने ठराव मंजूर झालेला आहे गेल्या सहा ते सात वर्षापासून मंजूर झालेल्या ठरावानुसार वर्षभराचे 12000 भाडे व इतर पुर्तता झाली होती परंतु कोणतीही ॲक्टीव्हिटी तीथे झालेली नाही. कोणतीही कृती झालेली नाही. संबधीतांचा चेकही घेत नाही, याचे कारण काय? खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार भाडे वसुली करण्यात येते.

श्री.रेणुकादास वैद्य :श्रेयनगर येथील विरसावरकर सभागृह, श्रेयनगर येथे संत सेना भवन, विकास नगर, विद्यानगर सभागृह दिलेले आहे त्याचा मागचा जमा झालेले चेक किती याची माहिती देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :माहिती सध्या उपलब्ध नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :पैसे भरायला तयार असतांना पैसे भरून घेत नाही.

मालमत्ता अधिकारी :सामाजिक सभागृहाचे भाडे वसुली थांबलेली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :पॉलिसी तयार झालेली नाही, परंतु नागरीक पैसे भरायला, चेक द्यायला तयार आहेत. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. पैसे भरून घेण्याबाबत मा.सभापती यानी कृपया आदेशित करावे.

मा.सभापती :ज्यांच्या कडुन पैसे भरून घेत नाही, त्यांचे पैसे भरून घेण्यात यावे, त्यांना रेग्युलाईझ करण्यात यावे. तसेच सदरील सादर झालेल्या प्रस्तावाबाबत पत्र आलेले आहे की, ही संस्था ब्लॅकलिस्ट आहे. त्या संस्थेचे काम काय आहे.

मालमत्ता अधिकारी :सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आहे.

मा.सभापती :सविस्तर माहितीसह विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 05 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.रफियोद्दीन (अनुरेखक) यांनी त्यांच्या आईच्या नामे नसीबा बी. मो. फय्याजोद्दीन यांच्या हृदयावरील शस्त्रक्रिया या आजारावर उपचार करण्यासाठी रक्कम रू.3,05,377/- (तीन लाख,पाच हजार तीनशे सत्यात्तर रूपये फक्त) स्वतः खर्च केलेले आहे.

त्यानुषंगाने सदर वैद्यकीय खर्चाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाची देयक एकूण रक्कम रू.3,05,377/- सादर केले असून, त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.9,981/- वजा जाता अनुज्ञेय रक्कम रू.2,95,396/- च्या 90% रक्कम रू.2,65,856/- (दोन लाख पासष्ट हजार आठशे छप्पन) व त्यापैकी एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.15,268/- (पंधरा हजार, दोनशे आडुसष्ट) महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,50,588/- (दोन लाख पन्नास हजार, पाचशे अठ्ठ्यांशी) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

संबंधीतास वैद्यकीय अग्रीम रक्कम रू.1,50,000/- अदा करण्यात आलेली असून वैद्यकीय अग्रीम रक्कम वजा जाता रक्कम रू.1,00,588/- अदा करणेस मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 5 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.रफियोद्दीन (अनुरेखक) यांनी त्यांच्या आईच्या नामे नसीबा बी. मो. फय्याजोद्दीन यांच्या ह्दयावरील शस्त्रक्रिया या आजारावर संबंधीतांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाची देयक एकूण रक्कम रू.3,05,377/- सादर केले असून, त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.9,981/- वजा जाता अनुज्ञेय रक्कम रू.2,95,396/- च्या 90% रक्कम रू.2,65,856/- (दोन लाख पासष्ट हजार आठशे छप्पन) व त्यापैकी एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रू.15,268/- (पंधरा हजार, दोनशे आडुसष्ट) महानगरपालिका फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,50,588/- (दोन लाख पन्नास हजार, पाचशे अठ्ठ्यांशी) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात आली असल्यामुळे, संबंधीतास वैद्यकीय अग्रीम रक्कम रू.1,50,000/- अदा करण्यात आलेली असून वैद्यकीय अग्रीम रक्कम वजा जाता रक्कम रू.1,00,588/- अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 06 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.02 (जुना) मधील जळगाव रोड ते मयुर पार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे अंदाजपत्रकीय रक्कम रू.36,73,201/- या कामास मा.स्थायी समिती सभा दि.03/09/2014 ठराव क्र.68 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा दि.27/02/2015 ठराव क्र.109 अन्वये सदरील कामासाठी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.12% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे. कार्यादेश जा.क्र.मनपा/वार्ड अभि-ब/85/2015 दि.13/03/2015 अन्वये सदरील काम मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांना प्रदान करण्यात आले असून सदरील काम प्रगतीपथावर आहे. या कामा अंतर्गत करावयाच्या मयुर पार्क येथील मारोती मंदिर ते देवगिरी बँक या रस्त्याचे काम काळी माती असलेल्या जमिनीवर करावयाचे आहे. त्यामुळे सदरील रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी रस्त्याचे खोदकाम करून काळी माती खोदुन काढणे, कठीण मुरूम, जी.एस.बी. व वेट मिक्स चा थर टाकणे इत्यादी कामे करणे तांत्रीकदृष्ट्या आवश्यक आहे. सदरील बाबींचा समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही. त्यामुळे सदरील बाबींकरीता अतिरिक्त बाबी (Extra Items) रक्कम रू.5,62,124/- सह सुधारीत अंदाजपत्रक रू.4085203/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामासाठी लागणारी वाढीव तरतुद रक्कम रू.5.00 लक्ष मा.सर्वसाधारण सभा दि.18/02/2017 ठराव क्र.907 अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रक्कम रू.40,85,203/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास (अतिरिक्त बाबींसह) मा.आयुक्त महोदय यांनी दि.06/05/2017 रोजी मान्यता दिली आहे.

तरी सुधारीत अंदाजपत्रक (अतिरिक्त बाबींसह) रक्कम रू.40,85,203/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर तसेच वाढीव काम (निविदेत अंतर्भुत बाबी निविदा दराने व अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने) सदरील कामाचे ठेकेदार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 6

श्री.शेख मतीन :सदरील कामात पाच लाख रूपयांची वाढ करून विना टेंडर काम देता येते का?

श्री.रेणुकादास वैद्य :कार्योत्तर मंजूरीसाठी प्रकरण आहे का?

शहर अभियंता :पाच लाखाचे अतिरिक्त काम आहे. तीथे सगळी काळी माती आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :इस्टीमेट तयार करतांना हया बाबी लक्षात आल्या नव्हत्या का? सदरील प्रस्ताव सन 2014 ला मंजूर झाला आहे. 37 लाखाचे काम तीन वर्षापासून काम चालू आहे. या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

शहर अभियंता :मयुरपार्क येथे आठ महिण्यापासून काम थांबवलेले आहे. स्वतः सदरील ठिकाणी जावुन काम बघितलेले आहे. काम केले असते तर सर्व रोड खचला असता. कंन्सोलडेटेशन

साठी करावे लागले आहे.दिड मीटर खोदुन स्टँर्डड सेक्शन द्यावे लागणार, कंन्सोलडेटेशन साठी सहा महिणे द्यावे लागले. त्याला पेमेंट देणार नाही.

श्री.सिताराम सुरे :सन 2014 साठी 36 लाखाची टेंडरचे कामाला संमती मिळाली, 2015 मध्ये सार्वत्रिक निवडणूक मुळे काम पेंडींग राहिले, भुमिगत गटार योजनेमुळे काम थांबलेले होते, सन 2016 मध्ये पैसे उपलब्ध नसल्यामुळे गुत्तेदाराने काम करण्यास असमर्थता दाखवली. सध्या त्या रस्त्यांची नागरीकांना आवश्यकता आहे. आता प्रस्ताव आलेला आहे.

मा.सभापती :विषय 6 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.02 (जुना) मधील जळगाव रोड ते मयुर पार्क पर्यंतच्या रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सुधारीत (अतिरिक्त बाबींसह) रक्कम रू.40,85,203/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते तसेच वाढीव काम (निविदेत अंतर्भुत बाबी निविदा दराने व अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने) सदरील कामाचे ठेकेदार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 07 :**

विषय : "टॅक्टर लोडर्स (06 नग) पुरवठा करणे" या कामासाठी ठेकेदार मे.महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज, कन्नड यांचेकडून प्रति नग रूपये 132100/- दराने 06 ट्रॅक्टर्स लोडर्स खरेदीसाठी रूपये 7926000/- रकमेची निविदा स्विकृत करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाटेंडर्स आय.डी.क्र.-2016-AMCA-165234-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (वार्ड 1,2,3 व 8) |
| 2. | कामाचे स्वरुप | ट्रॅक्टर लोडर्स (06 नग) पुरवठा करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय.<br>एकुण रूपये 55339622/- रकमेच्या पूर्वगणनपत्रास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.686 दिनांक 13/10/2016 अन्वये मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | मंजुर पुर्वगणपत्रकापैकी रूपये 8535000/- रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले आहे. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in)<br>प्रसिध्दीचा दिनांक 04/01/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.16/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.20/02/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| 1 | मे. महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज कन्नड | 7926000/- | 609000/- कमी | 7.14% कमी |
| 2 | मे.रत्नप्रभा ॲटो एजन्सीज औरंगाबाद | 8394042/- | 141000/- कमी | 1.65% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | पथदिवे नवीनीकरण व त्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे महालक्ष्मी ॲग्रो एजन्सीज कन्नड यांचेकडून निविदा रक्कम रूपये 8535000/- पेक्षा रूपये 609000/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 7926000/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

मा.सभापती :विषय क्रमांक 7 मध्ये दुरूस्ती आहे किंमत 13 लाख रूपये आहे दुरूस्ती मंजूर.

श्री. राजगौरव वानखेडे : या विषयामध्ये ॲडव्हान्स पेमेंटची अट आहे का? खुलासा करण्यात यावा.

प्र.उपअभियंता (यांत्रिकी):तत्कालिन उपअभियंता यांचेकडुन नजरचुकीने झालेले आहे. 90 टक्के पेमेंट थर्ड पार्टी तपासणी नंतर देण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :विषय क्रमांक 7 आणि 8 स्थगीत करण्यात यावे. मागच्या वर्षीचा अनुभव पाहता आजपर्यंत चेसीस, जेटींग मशिन आलेल्या नाहीत, आगाऊ रक्कम देण्याबाबत मनमानी केली जाते.

मा.सभापती :प्रशासनाने एजन्सी यांचेशी चर्चा करून माहिती देण्यात यावी. विषय क्रमांक 7 आणि 8 तो पर्यंत स्थगीत, पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 08 :</u>**

विषय : "हुकलोडर मशिन उभारणीसाठी 16 जीव्हीडब्ल्यु चेसीस (04 नग) पुरवठा करणे" या कामासाठी मे पगारीया ॲटो प्रा.लि. औरंगाबाद यांची 0.17 टक्के कमी दराची म्हणजेच रूपये 6690100/- रकमेची निविदा स्विकृत करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : महाटेंडर्स आय.डी.क्र.-2016-AMCA-165225-3

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - (वार्ड 1,2,3 व 8) |
| 2. | कामाचे स्वरुप | हुकलोडर मशिन उभारणीसाठी 16 जीव्हीडब्ल्यु चेसीस (04 नग) पुरवठा करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय., घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेची कार्यरत वाहने कमी पडत असल्यामुळे 04 हुकलोडर मशिन्स, 50 हुकलोडर कंटेनर्स, हुकलोडर मशिनच्या उभारणीसाठी 04 नग 16 जीव्हीडब्ल्यु चेसीस व 06 ट्रॅक्टर लोडर्स खरेदी करण्यासाठी एकुण रूपये 55339622/- रकमेचे पूर्वगणनपत्र मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले. या पूर्वगणनपत्रास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.686 दिनांक 13/10/2016 अन्वये मान्यता प्राप्त आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | मंजुर पुर्वगणपत्रकापैकी रूपये 6701472/- रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले आहे. |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | (www.mahatenders.gov.in) प्रसिध्दीचा दिनांक 03/01/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.16/01/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.10/02/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त | |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम रूपये | टक्केवारी |
| 1 | मे पगारीया ॲटो प्रा.लि. औरंगाबाद | 6690100/- | 11372/- कमी | 0.17% कमी |
| 2 | मे.ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा.लि. हैद्राबाद | 8568000/- | 1866528/- जास्त | 27.85% जास्त |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | पथदिवे नवीनीकरण व त्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे पगारीया ॲटो प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून निविदा रक्कम रूपये 6701472/- पेक्षा रूपये 11372/- ने कमी म्हणजेच रक्कम रूपये 6690100/- मध्ये करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 09 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर हागणदारीमुक्त करणे करीता ज्या नागरीकांकडे शौचालय नाही व ते उघड्यावर शौचास जात आहे अशा नागरीकांना अभियान अंतर्गत वैयक्तीक शौचालय बांधणे करीता केंद्र शासन व राज्य शासनामार्फत अनुक्रमे रक्कम रू.4000+8000 असे एकूण रक्कम रू.12000/- प्रति शौचालय इतके अनुदान विरीत करण्यात येते. त्या माध्यमातुन शहरामध्ये लाभार्थ्यांमार्फत वैयक्तीक शौचालय बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

तथापी पात्र लाभार्थीचे प्रमाण अनाधिकृत वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात असून तेथे जलनि:सारण वाहीन्या टाकलेल्या नाहीत त्यामुळे सदर भागात नागरीकांना सेफ्टीक टँकसह शौचालय बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी लाभार्थी यांना जास्तीचा खर्च येत असल्यामुळे त्यांना अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम

रू.6000/- मिळून देखिल ते शौचालय बांधण्यास उदासिन आहे. त्याकरीता मा.सर्वसाधारण सभा दिनांक 17/03/2017 मध्ये विषय क्र.948 अन्वये ठराव पारित होऊन सेफ्टीक टँकसह शौचालय बांधकाम करण्यासाठी लाभार्थ्यास रक्कम रू.3000/- प्रति शौचालय इतके सामाजिक बांधीलकी (CSR) च्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या निधीमधून किंवा महानगरपालिकेच्या फंडामधुन अतिरिक्त निधी देणे करीता मंजुरी मिळालेली आहे.

वैयक्तिक शौचालयासाठी पात्र लाभार्थ्यास अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत होऊन देखिल त्यांच्या उदासिनतेमुळे वैयक्तिक शौचालय बांधकामाची गती संथ आहे. सदर अभियानात औरंगाबाद शहर दिनांक 30 जुन 2017 पर्यंत हागणदारीमुक्त करणे बाबत शासनाचे निर्देश आहे. तसेच शासन निर्देशानुसार (शासन निर्णय क्रमांक/स्वभाअ/2015/प्र.क्र.23/नवि-34 दिनांक 15 मे 2015 व अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक स्वमअ-2016/सं.क्र.228/नवि-34 दिनांक 01 मार्च-2016 नुसार) अनुदान लाभार्थीच्या बँक खात्यावर RTGS द्वारे जमा करणे व वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केवळ लाभार्थ्यांमार्फतच करून घेणे बंधनकारक आहे. परंतु अभियान राबविण्याची गती वाढविण्यासाठी वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम सामाजिक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांच्यामार्फत करण्यात येऊन त्यांना बांधकामाच्या मोबदल्यापोटी लाभार्थ्यास मिळणारे शासन अनुदान रक्कम रू.12000/- प्रति शौचालय व सेफ्टीक टँकसह बांधकामासाठी अतिरिक्त अनुदान रक्कम रू.3000/- असे एकूण रक्कम रू.15000/- इतके लाभार्थ्याच्या स्वंय घोषणापत्र/हमीपत्र च्या आधारे सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदार यांना महानगरपालिकेतर्फे वितरीत करण्यात येईल.

त्यानुषंगाने सदरील सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार पात्र लाभार्थ्यांकडून स्वंय घोषणापत्र/हमीपत्र घेऊन ज्यामध्ये लाभार्थ्यास वैयक्तीक शौचालयासाठी मिळणारे अनुदान ते सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदारास बिनशर्त हस्तांतरीत करणेस सहमती देणार आहे, त्या आधारे सदरील सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार शौचालयाचे बांधकाम सेफ्टीक टँकसह लाभार्थ्यास पूर्ण करून देणार आहे.

करीता वरीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार शहर दिनांक 30 जून 2017 पर्यंत हागणदारी मुक्त करणेसाठी लाभार्थ्यामार्फत अनुदान सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांना देणेकरीता लाभार्थ्यांचे स्वंय घोषणापत्र घेण्यात येऊन वैयक्तीक शौचालयाचे शासनाचे अनुदान रक्कम 12000/- व सामाजिक बांधीलकी (CSR) च्या माध्यमातून उभारण्यात येणारा निधी किंवा महानगरपालिकेच्या फंडातील रक्कम रू.3000/- असे एकूण रक्कम रूपये 15000/- प्रती वैयक्तीक शौचालय इतके अनुदान सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांना वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत वितरीत करणेचा तसेच विविध सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांचे मार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्याचे अभियान राबविण्यासाठी इच्छुक संस्थाची नेमणूक करणे, त्यांचेसोबत आवश्यक ते करारनामे करणे व या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी महानगरपालिका, आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 9

श्रीमती संगीता वाघुले :शौचालयाबाबतची माहिती संबधीत अधिकारी यांना वारंवार मागणी करत आहे. माहिती देण्यात येत नाही, शौचालयसाठी 12000 रूपये अनुदान आहे. पहिल्या टप्पा हा 6000 आहे व दुसऱ्या टप्प्यामध्ये शौचालय बांधल्यानंतर देवु असे सांगण्यात येते, काही नागरीकांना दुसऱ्या टप्प्याचे अनुदान मिळालेले नाही, नागरीकांनी शौचालय, शौचालयाचे दारे लावुन बांधलेले आहे. शौचालयाचे सर्वेक्षणासाठी अधिकारी जावुन दरवाजेबाबत आक्षेप घेतात त्यामुळे दुसऱ्या टप्प्याचे

अनुदान रद्द होते, दरवाजा कोणता वापरला हे महत्वाचे नाही, शौचालय बांधलेले आहे हे महत्वाचे आहे. शौचालयाच्या अनुदानासाठी नागरीकांकडुन पैशाची मागणी करतात,यावर कार्यवाही करण्यात यावी.चौकशी करण्याचे आदेशित करण्यात यावे.

श्री.शेख मतीन :अनेक नागरीक या योजनेपासून वंचित आहे, गौरी शंकर कॉलनी, हिलाल नगर, आसेफिया कॉलनी, नारेगांव, शहागंज, मुस्लिम वसाहतीतील नागरीक या योजनेपासून वंचित आहे. सर्वेक्षणाचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती :30 तारखेपर्यंत शौचालयासंबधीतील अर्ज निकाली काढणेबाबत मा.आयुक्तांनी सांगीतलेले आहे. यासंबधी प्रशासनाने त्वरीत काम करण्यात यावे. शौचालयाचे दरवाजे व इतर शुल्लक कारणामुळे अडवणुक न होता अनुदान देण्यात यावे. शौचालयासंबधी पाहणी करून योजना सुरू करण्यात यावी.

श्री.किर्ती शिंदे :शौचालयासंबधीचे फॉर्म उपलब्ध नाही. फॉर्म उपलब्ध करून देण्यात यावे.

मा.सभापती :या संबधी प्रशासनाने दखल घेण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :ज्या भागात ड्रेनेज लाईन नसल्यामुळे सेफ्टी टँक नसल्यामुळे तेथील नागरीक आजारी पडतात. गुंठेवारी भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने याची दखल घेण्यात यावी. या संबधी प्रस्ताव सादर करण्यात यावा. विषय क्रमांक 9 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहर हागणदारीमुक्त करणे करीता ज्या नागरीकांकडे शौचालय नाही व ते उघड्यावर शौचास जात आहे अशा नागरीकांना अभियान अंतर्गत वैयक्तीक शौचालय बांधणे करीता केंद्र शासन व राज्य शासनामार्फत अनुक्रमे रक्कम रू.4000+8000 असे एकूण रक्कम रू.12000/- प्रति शौचालय इतके अनुदान विरीत करण्यात येते. त्या माध्यमातुन शहरामध्ये लाभार्थ्यांमार्फत वैयक्तीक शौचालय बांधण्याचे काम प्रगतिपथावर असल्यामुळे, प्रस्तावित केल्यानुसार शहर दिनांक 30 जून 2017 पर्यंत हागणदारी मुक्त करणेसाठी लाभार्थ्यामार्फत अनुदान सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांना देणेकरीता लाभार्थ्यांचे स्वंय घोषणापत्र घेण्यात येऊन वैयक्तीक शौचालयाचे शासनाचे अनुदान रक्कम 12000/- व सामाजिक बांधीलकी (CSR) च्या माध्यमातून उभारण्यात येणारा निधी किंवा महानगरपालिकेच्या फंडातील रक्कम रू.3000/- असे एकूण रक्कम रूपये 15000/- प्रती वैयक्तीक शौचालय इतके अनुदान सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांना वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत वितरीत करणेचा तसेच विविध सामाजीक संस्था/खाजगी बांधकाम व्यावसायिक/ कंत्राटदार यांचे मार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्याचे अभियान राबविण्यासाठी इच्छुक संस्थाची नेमणूक करणे, त्यांचेसोबत आवश्यक ते करारनामे करणे व या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी महानगरपालिका, आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 10 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मुकुंदवाडी आरोग्य केंद्रा लगतचे सभागृह कामगार कल्याण केंद्रासाठी मिळणे बाबत प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त, औरंगाबाद यांनी मागणी केलेली आहे. सदर सभागृहाचे क्षेत्रफळ 54 चौ.मी. एवढे असून त्यासाठी नाममात्र दराने म्हणजेच प्रतीमाह रू.1000/- प्रमाणे आकारणी केला आहे. सदर अभ्यासिकेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत कार्यालयाने स्वखर्चाने करावयाच्या आहेत. महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्रमांक 10 माहिती देण्यात यावी. |
| मालमत्ता अधिकारी | :महानगरपालिकेचे मुकूंदवाडी येथील सभागृह कामगार कल्याण विभागाने कामगारांच्या कल्याणासाठी, विविध योजनेच्या माहिती देण्यासाठी मनपाकडे जागेची मागणी केलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार प्रतीमहा भाडे आकारून जागा देण्याचे म्हणुन प्रस्ताव ठेवलेला आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :इतर संस्थांना महानगरपालिकेने दिलेल्या जागांचा अनुभव वाईट आहे. सभागृह देत असतांना त्या भागातील नागरीकांचे आणि नगरसेवकांची एनओसी घेणे आवश्यक आहे. एनओसी असेल तर सदरील संस्थेबरोबर जो करारनामा करणार आहे तो स्थायी समितीसमोर ठेवण्यात यावा. प्रस्ताव क्रमांक 10 व 11 या दोन्हीबाबतीत हाच निर्णय घेण्यात यावा. |
| मा.सभापती | :स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी केलेली सूचनेचे पालन करण्यात यावे, विषय क्रमांक 10 मध्ये ही सूचना टाकण्यात यावी. विषय 10,11 मंजूर. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मुकुंदवाडी आरोग्य केंद्रा लगतचे सभागृह कामगार कल्याण केंद्रासाठी मिळणे बाबत प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त, औरंगाबाद यांनी मागणी केलेली असल्यामुळे, सदर सभागृहाचे क्षेत्रफळ 54 चौ.मी. एवढे असून त्यासाठी नाममात्र दराने म्हणजेच प्रतीमाह रू.1000/- प्रमाणे आकारणी केलेल्या दरास मान्यता देण्यांत येते, तसेच सदर अभ्यासिकेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत कार्यालयाने स्वखर्चाने करणेस व महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 11 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सचिव छत्रपती लॉन टेनिस कोर्ट यांनी दि.04/11/2016 रोजी पत्र देऊन विनंती केली आहे की, ज्योतीनगर, जयनगर येथील महानगरपालिका टेनिस हॉल लगतच्या खुल्या जागेवर टेनिस कोर्ट उभारणेसाठी जागेची मागणी केली आहे. त्यांच्या संघटने मार्फत सदरील जागेचा खेळाडूंना टेनिस कोर्ट बनवून शिकविण्यासाठी व टेनिसपटु बनविण्यासाठीचा प्रयत्न असल्याने उक्त ठिकाणी जागेची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने ज्योतीनगर, जयनगर येथील टेनिस हॉल जवळील जागा ही रेखाकंनातील खुली जागा आहे. टेनिस हॉलचा वापर क्रिडा विभागामार्फत केला जात आहे. त्या समोरील जागा ज्याचे क्षेत्रफळ 10000 चौ. फुट (929.36 चौ.मी.) ऐवढे आहे. सदर ठिकाणी त्यांची संस्था स्वखर्चातुन दोन लॉन टेनिस कोर्ट तयार करणार असून महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण व मार्गदर्शन करणार आहेत. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता येणार नाही. याबाबत शपथपत्र सादर केले आहे. तसेच औरंगाबाद शहरातील गरीब जे टेनिस खेळण्यासाठी इच्छुक आहे, त्यांच्यासाठी मोफत प्रशिक्षण देणार आहेत. करीता सदर टेनिस कोर्टच्या जागेसाठी नाममात्र भाडे रू.1000/- प्रमाणे आकारणी करून सदर टेनिस कोर्टची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत संस्थेने स्वखर्चाने करावयाचे आहे व महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सचिव छत्रपती लॉन टेनिस कोर्ट यांनी दि.04/11/2016 रोजी पत्र देऊन विनंती केली असल्यामुळे, ज्योतीनगर, जयनगर येथील टेनिस हॉल जवळील जागा ही रेखाकंनातील खुली जागा असल्यामुळे व टेनिस हॉलचा वापर क्रिडा विभागामार्फत केला जात असल्याने, त्या समोरील जागा ज्याचे क्षेत्रफळ 10000 चौ. फुट (929.36 चौ.मी.) सचिव, छत्रपती लॉन टेनिस कोर्ट यांच्या संस्थेस सदर

टेनिस कोर्टच्या जागेसाठी नाममात्र भाडे रू.1000/- प्रमाणे आकारणी करून सदर टेनिस कोर्टची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत संस्थेने स्वखर्चाने करावे व महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 12 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य केंद्र नेहरूनगर साठी साहित्य खरेदी करण्याकरीता मा.महापौर महानगरपालिका औरंगाबाद यांनी सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील महापौर आपत्कालीन निधी या लेखाशिर्षातून रू.50 लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे संदर्भीय सन्माननीय नगरसेविका वार्ड नंबर 26 नेहरूनगर यांचे दिनांक 10/11/2016 च्या पत्रामधील शिफारशीप्रमाणे आवश्यक असणारे साहित्य, उपकरणे, यंत्र सामुग्री, इत्यादीची यादी निश्चित करण्याकरीता समिती गठीत करण्यात आलेली आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेमध्ये समितीची बैठक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनामध्ये दि.12/01/2017 रोजी दुपारी 4.00 वाजता संपन्न झाली.

आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे रूग्णालयात प्रसुती सेवा, कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया सेवा, पॅथालॉजी लॅब अद्यावत करणे, आधुनिक क्ष किरण, सोनोग्राफी इत्यादी यंत्र, उपकरणे, सामुग्री यांची संख्या तांत्रिक विनिर्देशासह निश्चित करण्याकरीता समितीची बैठक संपन्न झाली समितीने खालील बार्बीच्या तांत्रिक विनिर्देशास मान्यता दिलेली आहे. सोबत जोडण्यात आली असून कृपया अवलोकन व्हावे.

उपरोक्त बाबी व्यतिरिक्त सोनोग्राफी मशीन करिताच्या तांत्रिक विनिर्देशास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सोनोग्राफी मशीन करिताचे तांत्रिक विनिर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावरून घेण्यात आलेले आहेत.

महानगरपालिका आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांच्या समितीने परिच्छेद 26 मध्ये प्रस्तावित आंतररूग्णालय सेवा सुरू करण्याकरीता आय. पी. एच.एस. स्टँडर्ड नुसार स्टाफ उपलब्ध करून देण्याबाबत व त्यानंतर खरेदी प्रक्रिया राबविणे बाबत समितीने मत नोंदविलेले आहे.

शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उद्योग-4 दिनांक 30/10/2015 नुसार आरोग्य विभागाकरीता गठीत करण्यात आलेल्या खरेदी समितीच्या दिनांक 07/03/2017 रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे रूग्णालयात प्रसुती सेवा, कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया सेवा, पॅथॉलॉजी लॅब अद्यावत करणे, आधुनिक क्ष-किरण, सोनोग्राफी इत्यादी यंत्र, उपकरणे, सामुग्री खरेदीपूर्वी आवश्यक असणारा वैद्यकीय, निमवैद्यकीय व इतर कर्मचारी वर्ग उपलब्धतेसह प्रस्ताव सादर करणे व साहित्य खरेदी करिता ई-निविदा मागविणे साठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस खरेदी समितीची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

आय.पी.एच.एस. स्टॅण्डर्ड नुसार आंतर रूग्णालयाकरीता आवश्यक असणारे अधिकारी / कर्मचारी खालीलप्रमाणे.

**Man Power - Doctors**

| Sr. No. | Staff | Hospital | सरासरी मासिक वेतन प्रति महिना अंदाजीत रूपये | एकुण सरासरी मासिक वेतन अंदाजीत रूपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Medicine Specialist (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.40000/प्रति महिना | रू.40,000/- |
| 02 | O & G Specialist (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.40000/प्रति महिना | रू.40,000/- |
| 03 | Paediatrician (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.40000/प्रति महिना | रू.40,000/- |
| 04 | Anesthetist (Regular/trained) (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.40000/प्रति महिना | रू.40,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05 | Radiologist (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.40000/प्रति महिना | रू.40,000/- |
| 06 | Casualty Doctors / General Duty Doctors (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 3 | रू.40000/प्रति महिना | रू.1,20,000/- |

**Man Power - Para Medicals**

| Sr. No. | Staff | Hospital | सरासरी मासिक वेतन प्रति महिना अंदाजीत रूपये | एकुण सरासरी मासिक वेतन अंदाजीत रूपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Staff Nurse (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 9 | रू.10800/प्रति महिना | रू.97,200/- |
| 02 | General Duty Attendent / hospital workers (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 3 | रू.6000/प्रति महिना | रू.18,000/- |
| 03 | ECG Technician (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.7000/प्रति महिना | रू.7,000/- |
| 04 | Laboratory Technician (Lab + Blood Storage) (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.7000/प्रति महिना | रू.7,000/- |
| 05 | Laboratory attendant (Hospital worker) (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.6000/प्रति महिना | रू.6,000/- |
| 06 | Radiographer (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.7000/प्रति महिना | रू.7,000/- |
| 07 | Pharmacist (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.8000/प्रति महिना | रू.8,000/- |

**Man Power - Administrative Staff**

| Sr. No. | Staff | Hospital | सरासरी मासिक वेतन प्रति महिना अंदाजीत रूपये | एकुण सरासरी मासिक वेतन अंदाजीत रूपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Driver (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू. 8000/प्रति महिना | रू.8,000/- |
| 02 | Peon (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.6000/प्रति महिना | रू.6,000/- |
| 03 | Security Staff (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 3 | रू.6000/प्रति महिना | रू.18,000/- |

**Man Power - Operation Theatre**

| Sr. No. | Staff | Hospital | सरासरी मासिक वेतन प्रति महिना अंदाजीत रूपये | एकुण सरासरी मासिक वेतन अंदाजीत रूपये |
|---|---|---|---|---|
| 01 | OT Assistant (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 2 | रू.7000/प्रति महिना | रू.14,000/- |
| 02 | Safai Karmachari (पुर्ण वेळ कंत्राटी पध्दतीने) | 1 | रू.6000/प्रति महिना | रू.6,000/- |

उपरोक्त नुसार आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे 24 तास रूग्णालय सुरू करण्याकरीता उपरोक्त नुसार अधिकारी व कर्मचारी कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता सरासरी अंदाजीत रूपये 5,22,200/- प्रतिमाह वेतनावर खर्च अपेक्षित राहील. सदरील पदाकरीता मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून शासनाकडे प्रस्ताव पाठवुन पदास मान्यता घ्यावी लागेल याबाबत आस्थापना विभागाच्या अभिप्रायासह सदरील कार्यवाही व पद भरती ही आस्थापना विभागामार्फत करणेस्तव सादर. तसेच सदरील वेतनाचा खर्च त्यापश्चात महानगरपालिकेला कायमस्वरूपी करावा लागणार असून त्यामध्ये वेळोवेळी वाढ होत राहील. त्या व्यतिरिक्त साहित्य यंत्र उपकरणे इत्यादीची खरेदी व त्यापश्चातचा देखभाल दुरूस्तीचा खर्च वेळोवेळी महानगरपालिका फंडातून करावा लागणार आहे. सदरील पद भरती ही आस्थापना विभागामार्फत करणेस्तव सादर.

आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे आवश्यक असणारे साहित्य, वैद्यकीय उपकरणे, यंत्र सामुग्री, पॅथॉलॉजी लॅब उपकरणे व साहित्य, क्ष किरण उपकरणे व साहित्य यासाठी अंदाजे 48,34,335/- (रूपये अठ्ठेचाळीस लक्ष चौतीस हजार तीनशे पस्तीस फक्त) अपेक्षित आहे. या साहित्य खरेदीसाठी ई-निविदा मागविणे करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेच्या विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषया संदर्भात खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : नेहरूनगर आरोग्य केंद्र येथे 50 खाटांचे रूग्णालय मंजूर झालेले आहे. त्याठिकाणी 24 तास सेवा सुरू करायची आहे. आरोग्य केंद्रात प्रसुती सेवा, कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया सेवा पॅथॉलॉजी लॅब अद्ययावत करणे, सोनोग्राफी इत्यादी सेवा सुरू करणार आहोत. त्यासाठी यंत्र, उपकरणे, सामुग्री यासाठी इस्टीमेटसह सादर केलेले आहे.

मा.सभापती : इस्टीमेटसह सर्व माहिती सादर केलेली आहे. इस्टीमेटला मंजूरी देण्यात येते, मॅन पॉवर बाबत आस्थापना विभागामार्फत मा.सर्वसाधारण सभेकडे विषय पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य केंद्र नेहरूनगर येथे आवश्यक असणारे साहित्य, वैद्यकीय उपकरणे, यंत्र सामुग्री, पॅथॉलॉजी लॅब उपकरणे व साहित्य, क्ष किरण उपकरणे व साहित्य यासाठी येणाऱ्या अंदाजे 48,34,335/- (रूपये अठ्ठेचाळीस लक्ष चौतीस हजार तीनशे पस्तीस फक्त) खर्चाच्या अंदाजपत्रकास व या साहित्य खरेदीसाठी ई-निविदा मागविणे करीता सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते तसेच मॅन पॉवर बाबत आस्थापना विभागामार्फत मा.सर्वसाधारण सभेकडे विषय पाठविण्यात यावा यासही मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 13 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागामार्फत सन 2017-2018 या शैक्षणिक वर्षात एकूण 72 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या (सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत गणवेशासाठी ज्या लाभार्थ्यांना लाभ मिळाले **अशा लाभार्थींना वगळून उर्वरित वंचित विद्यार्थ्यांसाठी)** विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु. 400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी ) प्रमाणे एकूण 6532 विद्यार्थ्यांना एकूण रक्कम **रु.26,12,800/-** (अक्षरी सव्वीस लक्ष बारा हजार आठशे रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत करण्यात येईल.

| अ.क्र | केंद्रीय शाळेचे नाव | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | कें.प्रा शा.बेगमपूरा | 642 |
| 2 | नु.मा.शा. ज्युबलीपार्क | 508 |
| 3 | कें.प्रा शा.किराडपूरा नं.1 (उर्दू) | 830 |
| 4 | कें.प्रा शा.सिडको एन-12 | 369 |
| 5 | कें.प्रा शा.सिडको एन-7 | 1342 |
| 6 | कें.प्रा.शा.मुकूंदवाडी | 872 |
| 7 | कें.प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर | 384 |
| 8 | कें.प्रा शा.बन्सीलालनगर | 340 |
| 9 | कें.प्रा शा.इंदिरानगर बायजीपूरा | 284 |
| 10 | के.प्रा शा.हर्सूल गांव (म.) | 470 |
| 11 | के.प्रा.शा. बनेवाडी | 491 |
| | **एकूण लाभार्थी →** | **6532** |

सदर लाभार्थींना शिक्षण विभागांतर्गत लेखाशिर्ष **डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने मध्ये उपलब्ध सन 2017-18 मुळ अर्थसंकल्पात रु. 35.00** लक्ष तरतुद उपलब्ध आहे. गतवर्षाप्रमाणे याही वर्षी **प्रत्येक लाभार्थीस रु.400.00** याप्रमाणे गणवेश खरेदीसाठी अनुदान शालेय व्यवस्थापन समितीच्या सचिव तथा संबंधीत शाळेचे मुख्याध्यापकांच्या नांवे खालील निम्न निर्देशानूसार अनुदान वाटप करण्याचे मानस आहे.

- प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांनी गणवेश खरेदीची पावती सादर केल्यानंतर त्यांच्या बँक खात्यावर देयकाची अदायगी धनादेशाद्वारे करावी, रोख स्वरुपात अदायगी करु नये.
- शाळा स्तरावर दिनांकनिहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा.
- सदर रक्कम लाभार्थीना वाटप केल्याबाबतचा सविस्तर अहवाल शिक्षण विभागास कळवावा.

करिता वरीलप्रमाणे एकूण लाभार्थी संख्या 6532 करिता प्रत्येकी रु.400/- प्रमाणे एकूण रक्कम **रु.26,12,800/-** ही उपरोक्तप्रमाणे सर्व शाळांच्या शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांच्या नांवे RTGS द्वारे/ धनादेशाव्दारे खात्यांवर अनुदान वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागामार्फत सन 2017-2018 या शैक्षणिक वर्षात एकूण 72 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या (सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत गणवेशासाठी ज्या लाभार्थ्यांना लाभ मिळाले अशा लाभार्थीना वगळून उर्वरित वंचित विद्यार्थ्यांसाठी) विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु.400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी ) प्रमाणे एकूण 6532 विद्यार्थ्यांना एकूण र.रु.26,12,800/- (अक्षरी सव्वीस लक्ष बारा हजार आठशे रुपये फक्त) च्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यांत येते. तसेच एकूण लाभार्थी संख्या 6532 करिता प्रत्येकी रु.400/- प्रमाणे एकूण रक्कम रु.26,12,800/- ही उपरोक्तप्रमाणे सर्व शाळांच्या शालेय व्यवस्थापन समिती (सचिव तथा मुख्याध्यापक) यांच्या नांवे RTGS द्वारे/ धनादेशाव्दारे खात्यांवर अनुदान वर्ग करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्रीमती संगीता वाघुले :बालवाडीच्या सर्व मुलांसाठी सर्व शाळातील मुलांसाठी हा विषय दिलेला आहे का?

उपआयुक्त (प्र) :सर्व शिक्षा अभियानातील सर्व मुलांना गणवेश मिळतात. 9 वी आणि 10 वीच्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या फंडातुन गणवेश देण्यात येतो. बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी मनपाच्या फंडातुन गणवेश देण्यात येतो.

श्रीमती संगीता वाघुले :बालवाडीचा उल्लेख प्रस्तावामध्ये केलेला नाही.

उपआयुक्त (प्र) :सर्व बालवाडीच्या विद्यार्थी मिळुन 1 ली ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात येतो.

श्रीमती किर्ती शिंदे :मनपाकडुन सेमी इंग्रजीचे पुस्तके देण्यात येणार आहे का?

उपआयुक्त (प्र) :मागच्या वर्षी सेमी इंग्रजी मनपा शाळांमध्ये सुरू केलेले आहे. सेमी इंग्रजीची पहिलीची पुस्तेके देण्यात येईल, मॅथ आणि सायन्सच्या पुस्तकाबाबत माहिती घेवुन पुढील सभेमध्ये माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :या बाबीची तात्काळ दखल घेवुन सर्व विद्यार्थ्यांचे खाते उघडुन ड्रेस देण्यात यावे, ऐनवेळचा विषय मंजूर करण्यात येतो.

दोन अर्ज आलेले आहे. दोन दुकानांना परवानगी 31 मार्च 2018 पर्यंत आहे. त्यांना सील केलेले आहे. तो पर्यंत दुकाने चालू करण्याची विनंती केली आहे.

श्री.शेख मतीन :दारूची दुकाने आहे. सील केलेली आहे.

मा.सभापती :मा.जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :दारूबंदीसाठी सर्व प्रयत्न करीत आहे. संबधीताचे जेवढे मटेरियल आहे ते काढण्यात यावे. हा निर्णय मा.आयुक्तांशी निगडीत आहे. प्रशासनाने त्यांचे स्थरावर निर्णय घ्यावा.

मा.सभापती :याबाबत योग्य ती दखल घेवुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद